# भाजपा महाराष्ट्र प्रदेश

## श्री. हेमंत लक्ष्मण गावंडे, व्हिजन प्रॉपर्टीज, पुणे यांनी बनावट कागदपत्रे तयार करुन कृषि महाविद्यालय / विद्यापीठाच्या जमिनीवर टी.डी.आर. मिळविण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द दाखल करण्यात आलेला एफ.आय.आर.

## स.नं. ६२, फायनल प्लॉट नं. १४, बोपोडी, पुणे

## प्रेस नोट

**मा.महोदय**

- पुणे येथील कृषी विद्यापीठ यांच्या मालकीची जमीन मिळकत खाजगी मालकीची असल्याचे दाखवून बांधकाम व्यवसायीक व्हिजन प्रॉपर्टीज चे भागीदार हेमंत लक्ष्मण गावंडे यांनी शेकडो कोटी रुपयांचा टीडीआर बनविण्याचा प्रयत्न केलेबाबत शासनातर्फे दखलपात्र गुन्हा नोंद झाला असून त्यांचे नांव बनावट व बोगस कागदपत्रांच्या आधारे नोंद करण्यात आलेल्या 7/12 सदरी शासनाने सुनावणी घेऊन कमी केले. त्याबाबत थोडक्यात खालीलप्रमाणे माहिती देत आहे.
- सन १७७५ मध्ये श्रीमंत माधवराव पेशवे यांनी भट कुटुंबिय यांना पुरुष वंशज अस्तित्वात असेपर्यंत सदर जमीनीतून मिळणारे उत्पन्न उपजिविकेचे साधन म्हणून वापरण्याकरीता ईनामाने दिले होते.
- सदर जमिन भट कुटुंबिय यांनी भूविकास बँकेकडे गहाण ठेवली असता त्याची परतफेड वेळेत न केल्याने सदर भूविकास बँकेने ती विक्रीस काढली असता **The Secretary for State** यांनी ती जमिन मिळकत दिनांक ८ डिसेंबर १८८३ रोजी नोंदणीकृत दस्तान्वये दुय्यम निबंधक, मुंबई यांचे कार्यालयात दस्त क्रमांक २०७-अे अन्वये रक्कम रुपये ११,०००/- या किमतीस विकत घेतली. परंतु सदर जमीन मिळकतीवर भट कुटुंबिय यांनी काही बांधकाम केले होते. त्या बांधकामापोटी वार्षिक १२२ रुपये भट कुटुंबिय यांना ईनाम अस्तित्वात असे पर्यंत देण्यात यावे, अशी अट दस्त क्रमांक २०७-अे यामध्ये नमूद आहे.
- सदर अटीनुसार ८ डिसेंबर १८८३ पासून शासनातर्फे भट कुटुंबिय यांना सन १९५३ पर्यंत वार्षिक १२२/- रुपये दिले जात होते व अशी रक्कम देणे आहे हे माहित असावे म्हणून ७/१२ सदरी शासनाच्या नांवासह भट यांचे नांव इनामदार म्हणून देखील नोंद करण्यात आले होते.
- दिनांक १ ऑगस्ट १९५३ रोजी ईनाम निर्मुलन कायदा अस्तित्वात आल्याने व त्या कायद्यानुसार फक्त ज्या ईनामदारांच्या जमिनी प्रत्यक्ष ताबे वहिवाटीत होत्या अशाच ईनामदारांना त्या अटी व शर्तीवर रि-ग्रांट करुन मिळण्याचा हक्क व अधिकार होता. परंतु भट कुटुंबिय यांचेकडून ८ डिसेंबर १८८३ मध्येच ताबा काढून घेण्यात आला असल्याने व सदर जमिनीवर शासनाचा ताबा व कृषी विद्यापीठाची वहिवाट असल्याने भट कुटुंबिय यांना त्या जमिनी रि-ग्रांट करुन मिळण्याचा हक्क व अधिकार खरेदी खत दिले असल्याने नव्हता.
- ईनाम निर्मुलन कायदा १९५३ अस्तित्वात आल्याने कृषी विद्यापीठाने देखील मामलेदार यांना पत्राद्वारे कळविले की, ईनाम निर्मुलन कायद्यान्वये भट यांना दिलेले ईनाम रद्द करण्यात आलेले आहे, त्यामुळे ईथून पुढे त्यांना देण्यात येणारे वार्षिक १२२/- रुपये कायमस्वरुपी बंद करण्यात येत आहेत व तशी नोंद फेरफार सदरी लिहून व नोंदवून ठेवण्यात आली आहे.
- शासनाने १२२/- रुपये देणे बंद केल्यानंतर भट कुटुंबिय यांनी १९५४ पासून आजमितीपर्यंत कधीही त्याबद्दल तक्रार दाखल केलेली नाही.
- सन १९८७ मध्ये पुणे म.न.पा.चा विकास आराखडा मान्य करण्यात आला त्यामध्ये सदर जागेवर पी.एम.टी करीता आरक्षण दाखविण्यात आले.
- दिनांक ५ जुन १९९७ रोजी पुणे शहरात **TDR** चे धोरण अस्तित्वात आले व त्याचा गैरफायदा घेण्याच्या उद्देशाने भट कुटुंबिय यांचे महिला वंशज कै. यशदाबाई नारायण विध्वंस यांच्या वारसांनी बांधकाम व्यावसायीक व्हीजन प्रॉपर्टीजचे हेमंत लक्ष्मण गवंडे यांच्याबरोबर दिनांक ०२/०२/२००९ व २६/०४/२०१० रोजी समजुतीचे टिपण लिहून ठेवले व सदर जागेच्या ७/१२ सदरी कै. यशदाबाई नारायण विध्वंस यांच्या वारसांचे नांवे नोंद झाल्यानंतर व सदर

जागेचे पुणे म.न.पा. कडून मंजूर होणारा टिडी आर याचा हक्क रक्कम रु.७ कोटी या किमतीस विक्री करण्याचे ठरवून बेकायदेशिर व्यवहार केला.

- सदर मिळकतीचे ७/१२ सदरी बांधकाम व्यावसायीक हेमंत गवंडे यांनी तहसिलदार व मंडल अधिकारी यांचेबरोबर हातमिळवणी करुन सर्व्हे नं. ६२ बोपोडी याचे दोन ७/१२ तयार करुन घेतले. एक सर्व्हे नं. ६२ क्षेत्र २,०२,००० चौ.फु. व दुसरा सर्व्हे नं. ६२/१ क्षेत्र ३,४८,००० चौ.फु.
- सदर सर्व्हे नं. ६२/१ याचा ७/१२ दिनांक १७/०३/२०१० रोजी तयार करण्यात आला व लगेच दिनांक २६/०४/२०१० रोजी कै.यशदाबाई नारायण विध्वंस यांच्या वारसांनी व्हीजन प्रॉपर्टीजचे नांवे हवेली क्र. ११ येथे खरेदी खत दस्त क्रमांक ४४५६ अन्वये रक्कम रु. ७ कोटी या किमतीस लिहून व नोंदवून दिले. एवढेच नव्हे तर सदर खरेदीखतात पान क्र. ९ येथे सदर जमिनीचा खुला व मोकळा ताबा वंशपरंपरेने विध्वंस यांच्याचकडे असल्याचा व तो ताबा हेमंत गावंडे यांना खरेदीखताच्या वेळी दिला असल्याचा खोटा मजकुर टिडीआर मिळणेकामी खरेदीखतात नमूद केला व त्याचबरोबर हेमंत गावंडे यांच्या नांवे कुळमुखत्यार पत्र दस्त क्रमांक ४४५७ अन्वये लिहून दिले.
- दरम्यानच्या काळात विध्वंस यांचे नांव ७/१२ सदरी नोंद झाले असल्याचे कृषी विद्यापीठाला समजल्याने त्यांनी महसूल विभागाकडे आरटीएस अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होऊन विध्वंस यांचे नांवे नोंद झालेला सर्व्हे नं. ६२/१ हा ७/१२ कायमस्वरूपी रद्द करण्यात आला.
- सदर कुळमुखत्यार पत्राच्या आधारे हेमंत गावंडे यांनी महसूल विभागाकडे सदर दिनांक ५ एप्रिल २०१३ रोजीचे आदेशाविरुध्द अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात आरटीएस अपील दाखल केले.
- दिनांक ५ एप्रिल २०१३ रोजी सर्व्हे नं. ६२/१ हा ७/१२ रद्द करण्याचा आदेश झाला असल्याचे समजल्यानंतर व यापुर्वी दोन वेळेला पुणे म.न.पा. ने सदर जमिन शासनाच्या मालकीची असल्याने फेटाळला आहे याची माहिती असूनही दिनांक ५ एप्रिल २०१३ रोजी पुन्हा सदर जमीनीचा टिडीआर मिळणेकरीता तिसऱ्यांदा प्रस्ताव दाखल केला.
- हेमंत गावंडे यांचे वरील कृत्य माहिती अधिकार कार्यकर्ते रविंद्र बऱ्हाटे, पुणे यांना म.न.पा. येथील काही कनिष्ठ वर्गाच्या कर्मचाऱ्यांकडून समजल्याने त्यांनी त्वरित शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे व्हीजन प्रॉपर्टीज चे हेमंत गावंडे व इतर यांचेविरुध्द दखलपात्र स्वरुपाची दिनांक ३१/५/२०१४ रोजी फिर्याद दिली व माहिती अधिकारात कागदपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केले.
- दिनांक ९ जून २०१४ रोजी सदर जमिन घोटाळ्याबाबत रविंद्र बऱ्हाटे यांनी माजी भाजपा अध्यक्ष देवेंद्रजी फडणवीस यांना माहिती दिली असता सदर प्रकरणाबाबत देवेंद्रजी फडणवीस यांनी दिनांक ९ जून २०१४ रोजी विधीमंडळात प्रश्न उपस्थित करुन चौकशी व कारवाईची मागणी केली. त्यानुसार शासनाने चौकशी सुरु केली.
- माहे जानेवारी २०१५ मध्ये महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी कृषी विद्यापीठ, पुणे येथे बैठक घेऊन सदर प्रकरणाचा पाठपुरावा केला असता व्हीजन प्रॉपर्टीज चे हेमंत लक्ष्मण गावंडे, नगर अभियंता प्रशांत वाघमारे, विधी अधिकारी मंजूषा इधाते, राजेंद्र रामचंद्र विध्वंस, ऋषीकेश माधव विध्वंस, मंगल माधव विध्वंस, विजयआनंद अविनाश पुराणिक व जयश्री संजय एकबोटे यांनी बनावट व बोगस कागदपत्र तयार करुन शासनाची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार बऱ्हाटे यांनी दिनांक ३०/०५/२०१४ रोजी दिलेली फिर्याद व पुढे झालेली चौकशी यावरुन सहयोगी अधिष्ठाता, कृषी विद्यापीठ, पुणे यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे दिनांक १ फेब्रुवारी २०१५ रोजी भा.द.वि.४१७, ४६७, ४६८, ४७१,१२०ब व ३४ अन्वये हेमंत गावंडे व इतर सात यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला.
- हेमंत गावंडे यांनी उच्च न्यायालयात याचिका क्र.६६०१/१५ अन्वये दावा दाखल करुन सदर जमिन मिळकत याचे ७/१२ सदरी विध्वंस कुटुंबिय यांचे नांव नोंद करण्याची मागणी केली. परंतु मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ३/१०/२०१५ रोजी आदेश पारीत करुन सदर मालकी हक्काबाबत अपर जिल्हाधिकारी प्रदीप पाटील यांच्या न्यायालयात आरटीएस अपील दाखल असल्याने मुंबई उच्च न्यायालयातील याचिका फेटाळून लावली व अपर जिल्हाधिकारी यांना आठ आठवड्यात सुनावणी घेऊन निकाल देण्याचे आदेश देण्यात आले.
- मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची दखल घेऊन अपर जिल्हाधिकारी प्रदीप पाटील यांनी तातडीने सुनावणी घेऊन दिनांक ११/३/२०१६ रोजी आरटीएस अपील क्र. आरटीएस/२अ/६०६/२०१३ व आरटीएस/२अ/६६१/ २०१३ यामध्ये निकाल देऊन सदर जमिन मिळकत दिनांक ८ डिसेंबर १८८३ पासूनच शासनाच्या मालकीची असल्याचा निकाल देऊन हेमंत गावंडे यांनी केलेले अपील फेटाळून लावले.